www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १३६ वार गुरुवार दि. 30 जानेवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## वार्षिक क्रीडा स्पर्धांचे प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते उद्घाटन





**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

महात्मा ज्योतिबा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उदघाटन पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते संपन्न झाले त्यांनी उपस्थित स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. जेव्हा आपण शिकलेल्या महाविद्यालयात आपल्याला प्रमुख पाहुणे म्हणून सन्मानाने बोलवले जाते आणि आपण तिथे घडणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतो ही गोष्ट माझ्यासारख्या माजी विद्यार्थ्याला अभिमानाची वाटते. शिक्षकांनी दिलेली शिकवण आज नक्कीच सार्थकी लागली यात मला शंका नाही. असे प्रीतम म्हात्रे यांनी सांगितले. यावेळी प्रितम म्हात्रे यांच्यासोबत गणेश ठाकूर (प्राचार्य), राजाराम पाटील (उपप्राचार्य), नरेश मढवी (मा. उपप्राचार्य), नामदेव पवार (उपप्राचार्य विज्ञान), अनंता जाधव, प्रफुल्ल वशेणीकर, यशवंत उलवेकर,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

## महाकुंभमध्ये चेंगराचेंगरी: १७ जणांचा मृत्यू, अनेक भाविक जखमी; शाही स्नान रद्द

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे १३ जानेवारी पासून महाकुंभमेळा सुरू झाला आहे. आत्तापर्यंत कोट्यावधी भाविकांनी या कुंभमेळ्यात हजेरी लावली. मात्र याच कुंभमेळ्यात एकाच वेळी मोठी गर्दी झाल्याने चेंगराचेंगरी झाल्याची घटना घडली. त्यामुळे अनेक भाविक जखमी झाले आहेत तर १७ जणांचा मृत्यू झाल्याची शंका व्यक्त होत आहे. प्रयागराजमधील त्रिवेणी संगमाजवळ रात्री १ वाजताच्या सुमारास हा प्रकार घडला. जखमींना नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यामुळे आखाडा परिषदेनं मौनी अमावस्येनिमित्त होणारं अमृत स्नान रद्द करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आखाडा परिषदेच्या अध्यक्षांनी दिली आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदींनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याशी संवाद साधला आहे. तात्काळ मदत करण्याचे निर्देश पंतप्रधान मोदींनी दिले आहेत. महाकुंभात मौनी अमावस्येला अमृत स्नानापूर्वी चेंगराचेंगरी झाली. मात्र, जखमी आणि मृतांचा नेमका आकडा अद्याप स्पष्ट झालेला नाही. आज महाकुंभमध्ये मौनी अमावस्येचे अमृत स्नान आहे. त्यानिमित्ताने कोट्यावधी भाविक संगमावर स्नानासाठी आले होते, मात्र त्यामुळे प्रचंड गर्दी झाली. मध्यरात्री १ च्या सुमारास तेथे मोठी चेंगराचेंगरी झाली. त्यामध्ये अनेक जण जखमी झाले, त्यापैकी १७जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. जखमींना याठिकाणी उपस्थित असलेल्या रुग्णवाहिकांद्वारे रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. प्राथमिक माहितीनुसार ५० हून अधिक भाविक जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर महाकुंभमेळा प्रशासनाने आखाडा परिषदेला अमृत स्नान थांबवण्याचे आवाहन केले आहे. महाकुंभमेळा प्रशासनाने आखाडा परिषदेचे अध्यक्ष रवींद्रपुरी यांना आखाड्यांचे अमृत स्नान सध्या तरी थांबवण्यात यावे असे आवाहन केले आहे. मौनी अमावस्येला अमृतस्नान हा महाकुंभातील सर्वात महत्वाचा विधी आहे. आज येथे सुमारे १० कोटी भाविक येण्याची अपेक्षा आहे. यंदा १४४ वर्षांनंतर 'त्रिवेणी योग' नावाचा दुर्मिळ योग होत असून, या दिवसाचे आध्यात्मिक महत्त्व वाढले आहे.

> जगातील सर्वात मोठा धार्मिक मेळावा मानल्या जाणाऱ्या कुंभमेळ्यातील इतिहासात अनेकदा चेंगराचेंगरीच्या घटना घडल्या आहेत. कुंभमेळ्यात चेंगराचेंगरीच्या घटना कधी घडल्या होत्या, त्याबद्दल जाणून घ्या.... भारताच्या स्वातंत्र्यानंतरचा पहिला कुंभमेळा हा १९५४ चा कुंभमेळा होता. ३ फेब्रुवारी १९५४ ला मौनी अमावस्येच्या शुभ मुहूर्तावर पवित्र स्नान करण्यासाठी अलाहाबाद (आता प्रयागराज) येथील कुंभमेळ्यात मोठ्या संख्येने भाविक जमले होते. त्यावेळी चेंगराचेंगरी झाली होती. या चेंगराचेंगरीत जवळपास ८०० लोकांचा मृत्यू झाला होता. १९८६ मध्ये कुंभमेळ्यात चेंगराचेंगरी झाली होती. यामध्ये किमान २०० जणांना आपला जीव गमवावा लागला होता.

## अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूसाठी पथकर आणखी एक वर्षासाठी २५० रुपये इतकाच कायम, मंत्री मंडळाचा महत्वपूर्ण निर्णय

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतूवर चारचाकीच्या एकेरी प्रवासासाठी २५० रुपये पथकर भरावा लागतो. मुंबई ते नवी मुंबईला जोडणारा २२ किलोमीटर लांबीचा देशातील सर्वात मोठा सागरी पूल आहे. या पुलामुळे दक्षिण मुंबई ते नवी मुंबई हे अंतर सहज पार करता येते. १८ हजार कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या या सागरी पुलाला अटल बिहारी वाजपेयी यांचे नाव देण्यात आले. हा एम टी एच एल पूल मुंबईतील शिवडीपासून सुरू होतो. आणि रायगड जिल्ह्यातील न्हावा शेवा येथे संपतो. या पुलामुळे मुंबई ते नवी मुंबई हे २ तासाचे अंतर अवघ्या २० मिनिटात पूर्ण करता येते.त्यासाठी १ लाख ७७हजार ९० मेट्रिक टन स्टील आणि ५ लाखं ४ हजार २५३ मेट्रिक टन सिमेंट वापरण्यात आलं. हा पूल १०० वर्ष टिकेल असा कंपनीचा दावा आहे. कार, टॅक्सी, कमी वजनाची वाहनं, मिनी बस, टूएक्सल बस, लहान ट्रक याच वाहनांना पुलावरुन प्रवास करण्याची परवानगी आहे.



## उरणमध्ये एसटी भाडेवाढीच्या विरोधात शिवसेनेचे चक्का जाम आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**



उरण एसटी डेपोमध्ये ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी एसटी भाडेवाढीच्या विरोधात तीव्र आंदोलन करत चक्का जाम केला. शिवसैनिकांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत ही भाडेवाढ तात्काळ मागे घेण्याची मागणी केली आहे. एसटी बसच्या तिकीट दरात15 टक्के वाढ करून सर्वसामान्यांना खिसा कापणाऱ्या महायुती सरकारला दणका देण्यासाठी शिवसेनेच्या वतीने आज २८ जानेवारीला राज्यभरात चक्का जाम आंदोलन करण्यात आला आहे. आज शिवसैनिकांनी रस्त्यावर उतरत चक्का जाम आंदोलन केले.

उरण एसटी डेपो येथे ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी एसटी भाडेवाढीच्या विरोधात तीव्र आंदोलन करत चक्का जाम केला. शिवसैनिकांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत ही भाडेवाढ तात्काळ मागे घेण्याची मागणी केली आहे. उरणमधील एसटी डेपोजवळ मोठ्या संख्येने जमलेल्या शिवसैनिकांनी भाडेवाढीच्या निर्णयाचा निषेध व्यक्त केला. शिवसैनिक आपल्या मागण्यांवर ठाम आहेत. यावेळी पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता. जर सरकारने भाडेवाढ रद्द केली नाही, तर हे आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशारा शिवसैनिकांनी दिला आहे. "जनतेवर अन्याय खपवून घेतला जाणार नाही," असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. एसटी भाडेवाढ रद्द करण्याबाबत सरकार काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एसटीच्या तिकीट दरवाढीवरून महायुती सरकारच्या विरोधात सर्वसामान्यांमध्ये प्रचंड रोष निर्माण झालेला आहे. या दरवाढीचे सुरुवातीला समर्थन करणारे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एकदम यु टर्न घेतला आहे. या दरवाढीची मला कल्पनाच नव्हती. अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे भाडेवाढ झाली, असे सांगत प्रताप सरनाईक यांनी हात वरती केले आहेत. भाडेवाढ संदर्भात महायुतीचे सरकार काय निर्णय घेते याकडे जनतेचे लक्ष लागून राहिले आहे. यावेळी एसटी आगारप्रमुखाला निवेदन देण्यात आले.

यावेळी जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर, उपजिल्हाप्रमुख नरेश रहालकर, तालुका प्रमुख संतोष ठाकूर, संपर्क प्रमुख दीपक भोईर, सूर्यकांत दरणे, महेंद्र पाटील, रुपेश पाटील, एस. के. पुरो, अविनाश म्हात्रे, ममता पाटील, मनीषा ठाकूर, अमिता थळी, सुभाष तांडेल आदींसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. मात्र काही पदाधिकारी हे अशा कार्यक्रमात दिसत नसल्याने शिवसैनिकांनी नाराजी व्यक्त जास्तीत जास्त शिवसैनिकांनी उपस्थित रहाण्याची मागणी केली.

## अनाधिकृत झोपड्यांवर कारवाई

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**



खारघर सेक्टर 36 येथे अनाधिकृत बांधकाम वाढले होते, यामध्ये साधारणपणे 35 झोपड्यांचे बांधकाम झाले होते. यावर बुधवारी (दि. 29) रोजी दुपारी तीनच्या सुमारास मनोज घोडे पाटील, उपजिल्हाधिकारी व नियंत्रक अनाधिकृत बांधकाम यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण पस्तीस झोपड्या पाडण्यात आल्या. या कामी एक जेसीबी, दोन ट्रक, तीन जीप, एक सुपरवायझर, दहा लेबर पोलीस आणि सुरक्षा सुरक्षा कर्मचारी यांच्यावतीने तोडक कारवाई करण्यात आली. याबाबत सिडकोचे उपजिल्हाधिकारी व नियंत्रक अनधिकृत बांधकाम मनोज घोडे पाटील यांनी सांगितले, की खारघर हे शैक्षणिक आहे. तसेच हे शहर सुशिक्षित लोकांचे आहे. सध्या सिडको ने अनाधिकृत झोपड्यावर, तसेच रस्त्यावर असणार्या नर्सरीच्या नावाखाली ठाण मांडून बसलेल्या अनधिकृत नर्सरीच्या विरोधात विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. त्याचबरोबर आम्ही एखाद्या अतिक्रमनावर कारवाई केल्यानंतर, त्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होणार नाही याकडे आम्ही जास्त लक्ष देत आहोत.

> दादासाहेब फाळके चित्रपट युनियन महाराष्ट्र राज्य जनरल सेक्रेटरी अखिल भारतीय प्रहार चित्रपट संघटना मा .कार्याध्यक्ष मुंबई प्रदेश
> प्रोप्रायटर रुद्र मूव्हीज अँड एंटरटेनमेंट
> रुद्र फिल्म शूटिंग स्टुडिओ निर्माते श्री दिलीप ढेकळे सर यांची दैनिक युवक आधारच्या मुंबई विभागीय संपादक पदी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन



## निलेश सोनावणे - समाजाभिमुख व्यक्तिमत्व बहुजन चळवळीतील समाजसेवक

**दैनिक युवक आधार**
**मुकुंद कांबळे**
**सह संपादक**

पनवेल युवा याचे संपादक तथा जागृती फाऊंडेशन चे अध्यक्ष निलेश सोनावणे यांना नुकतेच भीमरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे .वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित भीम महोत्सव २०२५ या कार्यक्रमात त्याना जेष्ठ साहित्यिक ,कवी लेखक बबन सरोदे यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले .पनवेल युवा चे संपादक तथा जागृती फाऊंडेशन चे अध्यक्ष निलेश सोनावणे हे डॉ बाबासाहेब आंबेडकर ,चळवळीत कार्यकर्ते आहेत . छत्रपती शिवाजी महाराज ,शाहू महाराज ,महात्मा जोतिबा फुले ,सावित्रीबाई फुले ,कर्मवीर भाऊराव पाटील या महापुरुषांचा आदर्श समोर ठेऊन सामाजिक क्षेत्रात कार्य करीत असून दलित आदिवासी ,गरजू लोकांसाठी काम करीत आहेत. जेथे कोण पाहोचून मदत ,सामाजिक काम करीत नाहीत अशा दुर्गम भागात जाऊन दे समजासेवा करीत असतात , पर्यावरणातील समतोल राहावा या करीता दर वर्षी वृक्ष लागवडीचा संकल्प ते करीत आहेत आत्तापर्यंत हजारो झाडे लावून ती जगवली आहेत .पर्यावरणसह ,कला क्रीडा सांस्कृतिक वारसा जंपण्यासाठी ते काम करीत आहेत , गेली २० वर्षे बहुजन चळवळीत अग्रेसर काम करून दलित आदिवासी ,मागासवर्गीय समाजाच्या उन्नतीसाठी काम .जागृती फाऊंडेशन या सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष असून पर्यावरण ,आरोग्य ,कला सांस्कृतिक ,क्रीडा ,व्यवसाय मार्गर्शन , शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जातात. संस्थेचे माध्यमातून आत्तापर्यंत २०० जणांचे मोफत मोतीबिंदू ऑपरेशन,चष्मे वाटप विविध हॉस्पिटल यांच्या सहकार्याने केले आहे. पर्यावरण क्षेत्रात आत्तापर्यंत दोन हजार झाडे लागवड केली आहे .कोविड काळात पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समितीच्या



माध्यमातून धान्य वाटप मूलभूत साहित्य वाटप . महाड तळिये पूरग्रस्त लोकांना कपडे, धान्य ,औषधे वाटप ,पनवेल २००५ च्या पूर काळात पनवेल शहरी भाग सहित गावोगावी मेडिकल कॅम्प घेऊन लोकांना औषधें वाटप .दरवर्षी प्राथमिक शाळेतील दोन विधार्थ्यांना दत्तक घेऊन त्यांच्या शिक्षणाचा स्वखर्च . विविध शाळेत शैक्षणिक साहित्य ,सतरंज्या ,वह्या पुस्तके वाटप .रक्तदान शिबीर ,आरोग्य शिबीर यांचे आयोजन ,पनवेल युवा चषक ठेऊन क्रीडापटूंना प्रोत्साहन .निबंध स्पर्धांचे आयोजन . पत्रकारांसाठी अपघात विमा पॉलिसी वाटप . जागृती फाऊंडेशन ह्या माध्यमातून विविध उपक्रम ,जसे कि फळ वाटप ,उटणे, क्रीडा साहित्य वाटप असे विविध उपक्रम राबविणेत येतात . अनेक सामाजिक संघटनेचे ते अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत .लोकशक्ती संजीवनी प्रतिष्टान महाराष्ट्र या संस्थेचे ते राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत विविध धार्मिक संघटनांचे ते प्रतिनिधित्व करीत आहेत ,पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समितीचे गेली सात वर्ष सलग ते अध्यक्ष म्हणून काम करत आहेत ,त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत भीम महोत्सव समितीने त्यांना या वर्षी भीमरत्न पुरस्काराने सन्मानित केले आहे .या अगोदर पनवेल भूषण , भारतीय दलित साहित्य अकादमी चा डॉ बाबासाहेब आंबेडकर फेलोशीप अवॉर्ड , महाराष्ट्र दलित साहित्य अकादमीचा डॉ बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट लेखक पुरस्कार ,उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार, उत्कृष्ठ पत्रकार गौरव पुरस्कार ,निर्भीड युवा पत्रकार पुरस्कार , छत्रपती शाहू महाराज मानव सेवा रत्न पुरस्कार वामनदादा कर्डक उत्कृष्ट लेखक पुरस्कार या सह बौद्ध समाजाची शिखर संस्था असलेल्या भारतीय बौद्ध महासभेने त्यांना पत्रकाररत्न पुरस्काराने सन्मानित केले आहे .जिल्हास्तरापासून ते राज्यस्तरापर्यंत पंचवीस ते तीस पुरस्काराने त्यांना आतापर्यंत विविध संस्थांनी त्यांना गौरविले आहे . कोरोना सारख्या जागतिक लाटेत त्यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता अनेक रुग्णांची सेवा केल्याने माजी आमदार दत्तू शेठ पाटील शिक्षण प्रसारक मंडळाने कोरोना देवदूत पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे . निलेश सोनावणे यांचा वाढदिवस ३० जानेवारी रोजी असून त्यांच्या वाढदिवसानिमित्त सदर लेख आपल्या लोकप्रिय वर्तमान पत्रात प्रसिद्ध करावा अशी विनंती



## चिरनेरमध्ये हिमालयीन गिधाड सापडले





दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी

उरण तालुक्यातील चिरनेर येथे हिमालयीन ग्रीफोन गिधाड हे निपचित पडलेले आढळून आले आहे. तर, या गिधाडाची सुखरूप सुटका करून वनखात्याच्या ताब्यात देऊन उपचारासाठी पाठविण्यात आले आहे. गुरुवारी सकाळच्या सुमारास चिरनेर गावालगतच्या जंगल भागात एक गिधाड हे खाली पडलेले दिसून आले. यामुळे चिरनेर येथील फ्रेंड्स ऑफ नेचर संस्थेचे सदस्य जयवंत ठाकूर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी गिधाडाची पाहणी केली.यावेळी, त्याला उडता येत नसल्याने ते आजारी असल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

यामुळे त्याला वनखात्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. तर, हे हिमालयन ग्रीफोन गिधाड असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. तर, वन अधिकाऱ्यांनी हे गिधाड पुढील उपचारासाठी ऐरोली येथील केंद्रात नेण्यात आले आहे. तर, उरण तालुक्यात प्रथमतःच हे हिमालयन गिधाड दिसून आले असल्याचे सांगितले आहे.

## प्राणवायूसारखी दरवळणारी मराठी भाषा अभिजातच आहे - प्रवीण दवणे.

### मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने ठाणे महानगरपालिकेचा उपक्रम...

**दैनिक युवक आधार**
**ठाणे प्रतिनिधी**

**ठाणे ता २९ जाने :** जे ईश्वर असतं ते अभिजात, जे संपत नसतं ते अभिजात. अभिजाततेला सुरूवात नाही ती परंपरा आहे. मराठी भाषा ही काल परवा निर्माण झालेली नाही ती पूर्वापार चालत आलेली आहे. चंद्र, सूर्य, तारे, वारे समुद्र तशी मराठी त्यामुळे आपली मराठी भाषा ही कधीच नष्ट होवू शकणार नाही. मातृभाषेवर जो निस्सीम प्रेम करतो तो जगातल्या प्रत्येक भाषेवर प्रेम करतो. मुळातच आपल्या रक्तात मिसळलेली, प्राणवायू सारखी दरवळलेली अशी आपली मराठी भाषा असल्याचे प्रतिपादन प्रवीण दवणे यांनी केले. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने ठाणे महानगरपालिकेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा सांगता सोहळा आणि पारितोषिक वितरण समारंभ महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे संपन्न झाला. या निमित्ताने कवी, साहित्यिक प्रवीण दवणे यांचे 'मराठी भाषेचे अभिजात सौंदर्य' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. या कार्यक्रमास ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, जी.जी. गोदेपुरे, ज्येष्ठ पत्रकार मिलिंद बल्लाळ उपस्थित होते.




## पेणमध्ये एसटी भडेवाढ रद्द करण्याच्यासाठी शिवसेना ठाकरे गटाने केले चक्का जाम आंदोलन

दैनिक युवक आधार
पेण प्रतिनिधि

राज्य सरकारने लाडक्या बहिणींना १५०० रुपये देण्याची योजना जाहीर केली तर दुसरीकडे सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लावण्याचेही काम सुरू आहे, अस आरोप करत बुधवार दि.२९ रोजी रायगड जिल्ह्यातील पेण रामवाडी येथे शिवसेनेच्या ठाकरे गटाने चक्काजाम आंदोलन केले. पेणमध्ये शिवसैनिक रस्त्यावर उतरले होते. पेण रामवाडी विभागीय कार्यालयसमोर आंदोलन एसटी भाडेवाढीविरोधात ठाकरे पक्ष आक्रमक झाला असून, ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पेण शहरातील विभागीय मध्यवर्ती बस




स्थानकासमोर चक्काजाम आंदोलन केले. एकीकडे लाडक्या बहिणींना १५०० रुपये दिले जातात. तर दुसरीकडे एसटी बसची भाडेवाढ करून सर्वसामान्य जनतेच्या खिशाला कात्री लावण्याचे काम हे सरकार करत आहे, असा आरोप या शिवसैनिकांनी केला. रायगड जिल्ह्यातील एकूण ५ तालुक्यात हे आंदोलन करण्यात आले.

**१५ टक्क्यांची भाडेवाढ केली**

राज्य सरकारने राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बसचे १५ टक्के भाडेवाढ केल्यामुळे आता प्रवाशांसोबत राजकीय पक्ष देखील आक्रमक होताना पाहायला मिळत आहेत. पेण परिवहन मध्यवर्ती बस स्थानकासमोर एसटी बस आडवत ठाकरे पक्षाच्या शिवसैनिकांनी चक्काजाम आंदोलन केल आहे. यावेळी काहीकाळ बस देखील शिवसैनिकांनी रोखून धरल्या होत्या. तात्काळ भाडेवाढ निर्णय रद्द करावा, अशी मागणी यावेळी शिवसैनिकांनी रायगड एस टी विभागीय नियंत्रक दिपक घोडे यांना निवेदन देऊन सुनावले आहे. एसटी दरवाढीच्या विरोधात महाराष्ट्रामध्ये शिवसेना ठाकरे पक्ष आक्रमक होत रस्त्यावर उतरला आहे. यावेळी शिवसेना नेते प्रसाद भोईर, जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, अमिर (पिंट्या) ठाकुर,नरेश गावंड, समीर म्हात्रे,जगदीश ठाकुर, दिपश्री पोटफोडे,राकेश मोकल,योगेश पाटील,अचुत पाटिल मेघणा चव्हाण, वैशाली समेळ, दर्शना जवके,महानंदा तांडेल,वसंत म्हात्रे हिराजी चौगले आदी शिवसैनिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

## मंडल अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांच्या बायोमॅट्रीक हजेरी लावा :- विकास क्षत्रिय करणार मागणी

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

पुणे प्रशासकीय विभाग विशेष स्थान पुणे जिल्ह्यात फेस रिडिंग प्रणाली याची अंमलबजावणी होत नाही.याबाबत जिल्हाधिकारी पुणे व तहसीलदार इंदापूर यांच्याकडे थोड्याच दिवसात माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे इंदापूर तालुका अध्यक्ष विकास क्षत्रिय निवेदन देऊन मागणी करण्यात येणार असल्याचे सांगत आहेत. मंडल अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांच्या कामाची वेळ सकाळी ९:४५ ते संध्याकाळी ६:१५ वाजेपर्यंत आहे.मात्र वास्तव पाहता अनेक गावात ग्राम महसूल अधिकारी हे १२:०० ते ४:३० पर्यंत कार्यालयात हजर असतात अनेक वेळेस बाहेर असल्याचे संगितले जाते ते घरी असतात रजेवर असतात ते नेमके समजून येत नाही अनेक ठिकाणी कार्यालयात २ दिवसातून एकदा येतात. त्यांची विद्यमान स्थिती हजेरी हि त्यांच्या दैनंदिनी च्या आधारे वेतन अदा केले जाते असे समजते पण राज्यातील ९९% ग्राम महसूल अधिकारी हे दैनंदिनी लिहित नाहीत तहसीलदार कार्यालयात जमा होत नाहीत तहसीलदार,मंडळ अधिकारी यांच्या कडून तपासणी केली जात नाही.यांचे वेतन जमा करणे योग्य नाही. शासनाची राज्यभरातून मोठ्या प्रमाणात फसवणूक केली



जात आहे.जनतेचा पैसा वाया जाता कामा नये तरी तात्काळ राज्यातील ग्राम महसूल अधिकारी यांच्या बायोमॅट्रिक हजेरी सुरु करण्यात याव्यात जो पर्यंत बायोमॅट्रिक मशीन कार्यान्वित होत नाही तो पर्यंत मोबाईल ॲप वरून ऑनलाईन हजेरी ॲपमधून उपस्थिती नोंदविण्यात यावे. मुख्यालयाच्या ठिकाणी बायोमॅट्रिक हजेरी प्रणाली/फेस रिडिंग प्रणाली या सारख्या अद्ययावत यंत्रणेच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांची हजेरी नोंदविली करण्यात यावी.ग्राम महसूल अधिकारीच्या बाबतीत ज्या कार्यालयामध्ये मौजे / सज्जा ह्या शहरी भागाच्या जवळ आहेत अशा कार्यालयामध्ये बायोमेट्रीक हजेरी राबविण्यात येते.अतिदुर्गम,डोंगराळ भागात नेटवर्क नसल्यामुळे बायोमॅट्रिक प्रणालीद्वारे हजेरी प्रक्रिया राबविण्यास समस्या येऊ शकतात. तथापि,सध्यस्थितीत बहुतांश भागामध्ये नेटवर्क उपलब्ध आहे.त्यामुळे ज्या मौजा व सज्जा कार्यालया हे शहरी भागालगत आहेत,किंवा ज्या-ज्या ठिकाणी नेटवर्क कॉंनेक्टिव्हिटी उपलब्ध आहे अशा ठिकाणच्या मौजा व सज्जा कार्यालया मध्ये बायोमॅट्रिक/जीपीएस हजेरी प्रक्रिया राबविणे शक्य आहे.तरी ग्राम महसूल अधिकारी यांची बायोमॅट्रिक /जीपीएस हजेरी प्रणाली राबविण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्याबाबत उचित निर्णय घ्यावा,व हजेरी घेण्यात यावी जेणे करून त्यांच्या कार्यालयीन कामात गतिमानता निर्माण होईल व जनतेची सेवा करण्याची संधी जास्त मिळेल अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे इंदापूर तालुका अध्यक्ष विकास क्षत्रिय हे करणार आहेत.

## लिटिल आयडल किड्स स्कूल चे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

लिटिल आयडल किड्स स्कूल नवीन पनवेल हे स्नेहसंमेलन पनवेल मधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे शुक्रवार दिनांक २४ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

सदर कार्यक्रमाला पत्रकार उत्कर्ष समितीचे रायगड जिल्हा अध्यक्ष तथा आवाज महामुंबई चा चॅनेल चे संपादक मिलिंद खारपाटील,महाराष्ट्र लोक कल्याण कारी सेवा संस्थेचे संस्थापक एन डी खान, मुंबईचे माजी पोलीस सहायुक्त एकनाथ खोलम,, सिने अभिनेत्री रंजिता पाटील, दीपक शेट्टी,अंजनी सराफ,रत्नाकर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. राष्ट्रगीत, दिप प्रज्वलन यानंतर छोट्या छोट्या बच्चे कंपनीने सुरेख नृत्य करून टाळ्या, शिट्या मिळवल्या आणि अनेक वेळेस वन्स मोअर ची मागणी रसिक प्रेक्षकांनी केली.सायंकाळी ४ वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमात रात्रीचे ७ वाजून कसे गेले हे समजलेच नाही. खचाखच भरलेल्या या नाट्यगृहात रसिक प्रेक्षक, पालक वर्गाला अक्षरशः खुर्चीला खिळवून ठेवले होते. गेल्या १० वर्षात विद्यार्थी आणि पालक यांचा प्रतिसाद चांगला असल्याचे पूनम गुप्ता मॅडम यांनी सांगितले हे वार्षिक स्नेसंमेलन यशस्वी करण्यासाठी प्रिन्सिपॉल पूनम गुप्ता,चेअरमन मनोज गुप्ता, शिक्षिका शीतल भर्मा, जयीता करमरकर, मृणाल पवार,पूनम वर्मा,उर्मिला, स्वाती ,सुजाता ,क्षमा या सर्वांनी विशेष मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला कार्यक्रमाचे सुरेख सूत्र संचालन शिवांगी तिवारी यांनी केले.



## 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान

### पत्रकारांचे कायदेशीर प्रश्न व समस्या मार्गी उपसभापती - डॉ. निलम गोऱ्हे यांचे निर्देश

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,**

दि. २८ जानेवारी २०२५ रोजी. आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेतील पेन्शन, नियम व अटी शिथिल करून ज्येष्ठ पत्रकार आणि छायाचित्रपत्रकार यांना योजनेचा लाभ मिळण्याबाबत विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या मार्गदर्शनात बैठक झाली. जेष्ठ अधीस्वीकृती पत्रकार कार्ड व आयकर भरावा लागत नाही या दोन कागदपत्रकारांच्या आधारे पेन्शन प्रकरणे मंजूरीचा निर्णय मंत्रालयीन अधिस्वीकृती समितीने घ्यावे असे निर्देश उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिल्या. राज्य सरकारने सुरू केलेल्या आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेंतर्गत १८६



पत्रकारांना पेन्शन योजना सुरू आहे. या योजनेकरिता ५० कोटींची तरतुद करण्यात आली असून दरम्यान, जेष्ठ अधिस्वीकृती पत्रकारांना पेन्शन योजनेचा लाभ मिळण्याकरिता अनेक अटी, शर्तीतून जावे लागत आहे. याबाबत कोल्हापूर प्रेस क्लबच्या निवेदनातून विविध मुद्दे या बैठकीत मांडण्यात आले. पत्रकारांना विशिष्ट आजारांसाठी शासनाच्या योजनांमधून वैद्यकीय मदत मिळत असली तरीही नियमित आजारांसाठी वैद्यकीय मदत प्राप्त व्हावी याकरिता सी. एस. आर. फंडातून निधी प्राप्त करण्याचा प्रयत्न करा, पत्रकारांसाठी कायदा सहाय्य कक्ष तयार करा, जेष्ठ सेवा प्राधिकरणांतर्गत पत्रकारांच्या समस्या दूर करा, असे निर्देशही डॉ. नीलम गोऱ्हे यांनी माहिती संचनालय विभागाला दिल्या. जेष्ठ अधिस्वीकृती पत्रकार सन्मान योजनेतील सदस्यांची भविष्यातील वाढती संख्या लक्षात घेता, अधिक निधीचा प्रस्ताव वित्त विभागाला सादर करावा असेही सांगण्यात आले. त्याचबरोबर, पेन्शन योजना लागू होण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता तसेच, कार्यालयीन कर्मचारी असल्याच्या नोंदी ठेवण्याबाबत सर्व संपादकांना पत्र पाठवणार असल्याचे डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या. काही पत्रकार ज्या प्रसारमाध्यमात काम करत होते, त्यापैकी काही दैनिक सध्या अस्तित्वात नसल्याने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता होऊ शकत नाही, तसेच इतरही अडचणी लक्षात घेता, एक समिती गठित करावी असे निर्देशही डॉ. गोऱ्हे यांनी दिले. या बैठकीला माहिती संचनालय विभागाचे संचालक दयानंद कांबळे, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहार संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे, सरचिटणीस प्रवीण पुरो, माजी अध्यक्ष मंदार पारकर, कोल्हापूर प्रेस क्लब अध्यक्ष शीतल धनवडे, उपाध्यक्ष प्रशांत आयरेकर, संचालक समीर मुजावर, दिपक जाधव, मीडिया असोसिएशन ऑफ इंडियाच्या संस्थापक अध्यक्ष शीतल करदेकर, कोशाध्यक्ष चेतन काशीकर मीडिया असोशिएशन ऑफ इंडिया ,कोल्हापुर संस्थापक शेखर धोंगडे ही मंडळी उपस्थित होती! असे सुत्रांकडून समजले...

-- सु. बा. सरपडवळ, नाट्यसमीक्षक.

## महिला शेतकऱ्यांना संक्रांतीचे वाण म्हणून शेतकरी ओळख क्रमांक वाटप

**युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

रानवड येथे प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून रविवार दिनांक २६ जानेवारी रोजी महिला शेतकऱ्यांसाठी विशेष कॅम्पमध्ये संक्रांतीचे वाण म्हणून शेतकरी ओळख क्रमांक वाटप करण्यात आले. प्रांताधिकारी हेमांगी पाटील व तहसिलदार विशाल नाईकवाडे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या ग्राम महसूल अधिकारी सिद्धांत वाघमारे यांनी हा उपक्रम राबविला. या उपक्रमाने महिलांच्या हक्कांच्या जागृतीसह शेतकरी योजनांच्या लाभांविषयी सखोल माहिती पुरवली. महिला शेतकऱ्यांना कृषीविषयक योजनांमध्ये सक्षम करण्याचा उद्देश या उपक्रमामागे होता.सदर कॅम्पमध्ये महिलांना पिकविमा योजना,प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना,प्रधानमंत्री किसान सन्मान निधी,तसेच महिला शेतकऱ्यांसाठी असलेल्या विविध विशेष योजनांची माहिती देण्यात आली. तहसिलदार विशाल नाईकवाडे यांनी यावेळी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात शेतकरी महिलांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकला."महिला शेतकरी केवळ शेती कामात नव्हे तर तिच्या व्यवस्थापनातही कर्तव्यदक्ष ठरतात. त्यांना सरकारी योजनांचा लाभ मिळवून देणे ही काळाची गरज आहे,"असे त्यांनी नमूद केले. उपस्थित महिलांना राज्य व केंद्र सरकारच्या योजनांच्या निकषांपासून अर्ज प्रक्रियेपर्यंतची सविस्तर माहिती पुरवली गेली. शाश्वत शेती, आधुनिक पद्धतींचा वापर,आर्थिक नियोजन, व महिला सशक्तीकरणावर चर्चासत्रांचे आयोजन झाले.महिलांना त्यांच्या अडचणी मांडण्यासाठी खुला मंच उपलब्ध करून देण्यात आला. यावर स्थानिक अधिकाऱ्यांनी त्यांच्या शंकांचे निरसन केले.

**कार्यक्रमास विविध महिला शेतकरी मंडळांच्या प्रतिनिधींनी तसेच अनेक**

मंडळाधिकारी कु. शितल कुयटे, ग्रामपंचायत सरपंच संगीता गायकवाड,सदस्य विलास वाघ, उपस्थित सरपंच संगीता गायकवाड, सदस्य राजश्री वाढवणे,सिद्धार्थ गायकवाड,विलास



महिला शेतकरी ओळखपत्र वाटप प्रसंगी तहसिलदार विशाल नाईकवाडे, ग्राम महसूल अधिकारी सिद्धांत वाघमारे आदी सह शेतकरी महिला

वाघ, बाळासाहेब,संजय वाढवणे, नवनाथ चव्हाण,रेडगाव सरपंच मनीषा चव्हाण,बाळासाहेब वाघ,सेतू केंद्र चालक सुरेश धुमाळ, अशोक पठाडे ,शीतल पानपाटील ,गोकुळ कुशारे यांनी शिबिरात हजर राहून महिला खातेदार यांची नोंदणी केली. सहभाग घेतला. कॅम्पमुळे महिला शेतकऱ्यांना आत्मनिर्भर बनण्याची संधी मिळाली. यामध्ये माहितीमुळे महिला स्वतःचा आणि आपापल्या शेतीचा विकास कसा साधता येईल, याविषयी सकारात्मक दृष्टिकोन प्राप्त झाला. कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी महिलांचे कौतुक करताना तहसीलदार नाईकवाडे यांनी असे कॅम्प नियमितपणे आयोजित करण्याची गरज व्यक्त केली. "समाजाचा आणि अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या महिलांना सबल करणे म्हणजे विकासाला गती देणे आहे," असे सिद्धांत वाघमारे यांनी सांगितले. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने साकारलेला हा उपक्रम महिला शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरला आणि त्यांच्या विकासाच्या प्रवासाला नवा वेग देण्यास मदत केली.

## खेड तालुक्याच्या पश्चिम भागात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



दैनिक युवक आधार
प्रतिनिधी डॉ. देवेंद्र ओहाळ
खेड पुणे


खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील आदिवासी बहुल नायफड गावात 76 वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी संविधान हा ग्रंथ भारताचा प्राण असून संविधानाचे पारायण हे घराघरात झाले पाहिजे असे प्रतिपादन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अशोक शेठ शिंदे यांनी केले. नायफड गावातील ग्रामपंचायत, प्राथमिक शाळा, अंगणवाड्या व आरोग्य केंद्र येथील ध्वजारोहण मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी लेझीमच्या तालावरील मिरवणुका व शाळेच्या सांस्कृतिक स्नेहसंमेलनाने विशेष लक्ष वेधले. यावेळी हंसा फ्लेक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या वतीने शाळेला साडेसहा लाखाची मिनी कॉम्प्युटर लॅब व सोलर पॅनल प्रदान करण्यात आले. तसेच मुंबई महानगरपालिकेतील सेवानिवृत्त अधिकारी चिमणराव ठोकळ यांनी देखील शाळेला लॅपटॉप भेट दिले. यावेळी नायफड सोशल फाउंडेशन च्या वतीने विविध स्पर्धांमध्ये आणि परीक्षांमध्ये विजेत्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सन्मान चिन्ह व पुस्तके देऊन करण्यात आला. यावेळी गावच्या सरपंच करिष्मा ताई बांबळे, उपसरपंच दत्तात्रय माळी, सुनील मिलखे, रोहिदास भाईक, मुंबई मंत्रालयातील अधिकारी करण भाईक, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष सुदर्शन तिटकारे सदस्य अशोक भाईक, योगेश भाईक नायफड सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष निलेश तिटकारे, सोमनाथ गादेकर, पांडुरंग तिटकारे, विकास भाईक, विश्वनाथ ठोकळ, राजाराम तिटकारे, हंसा फ्लेक्स कंपनीच्या श्वेता हांडे मॅडम व त्यांचा संपूर्ण स्टाफ, तंटामुक्ती अध्यक्ष बाळासाहेब तिटकारे, जगदीश कोरडे, मुख्याध्यापक भास्कर बुरसे, अशोक चव्हाण, राहुल रावते तसेच सर्व ग्रामस्थ व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल शिंदे सर व आभार धनराज आचवलकर सर यांनी मानले.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

## 9 मीटरच्या खालच्या रस्त्यालगत पुनर्विकासाचा मार्ग मोकळा ;एमी ग्रुपचे मंगेश परुळेकर यांनी केली होती मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**



पनवेल सारख्या जुन्या शहरात 9 मीटर अथवा त्याखालोखाल 6 मीटरच्या रस्त्यालगतच्या असलेल्या जुन्या ईमारतीच्या पुनर्विकासाला मोठा अडथळा किचकट अटींमुळे येत आहे.याबाबत पनवेल मधील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक एमपी ग्रुपचे मंगेश परुळेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका कार्यक्रमात ते उपमुख्यमंत्री असताना केली होती.9 मीटर पर्यंतच्या ईमारतीच्या पुनर्विकासासंदर्भात काही सवलती देण्याचे देखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी जाहीर केले आहे. या निर्णयाचा सर्वात जास्त फायदा पनवेल शहराला होणार आहे.पनवेल शहरात 9 आणि 6 मीटरच्या शेकडो ईमारतीचे पुनर्विकास रखडले आहे. चाळी,मोडकळीस आलेल्या ईमारतींचा विषय परुळेकर यांनी फडणवीस यांच्यासमोर मांडला होता.ठाण्याला ज्या प्रकारे क्लस्टर डेव्हलपमेन्ट ला अतिरिक्त फायदा दिला होता.याबाबत फडणवीस यांनी अशा इमारतीना सवलत देण्याची घोषणा केली आहे.तसेच महानगरपालिकेच्या वतीने आकारल्या जाणाऱ्या शुल्कात सवलत,पालिकेच्या वतीने सवलती तसेच विविध करारासाठी अवघे 100 रुपाये मुद्रांक शुल्क आकारण्यात येणार आहे.पुनर्विकासाठी कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी दोन बँकासोबत करार करण्यात येणार असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. राज्यभरात शासनाच्या या नव्या पुनर्विकास धोरणाचा फायदा होणार असल्याचा आशावाद यावेळी परुळेकर यांनी व्यक्त केला.

## राष्ट्रीय ओबीसी फाउंडेशनच्या मराठवाडा अध्यक्ष पदी अक्षय बांगर तर बीड जिल्हा उपाध्यक्ष पदी सुरज गवळी यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -**



बीड येथील सामाजिक कार्यकर्ते अक्षय बांगर यांची राष्ट्रीय ओबीसी फाउंडेशनच्या मराठवाडा अध्यक्ष युवा आघाडी पदी तर बीड जिल्हा उपाध्यक्ष पदी सुरज गवळी यांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रीय ओबीसी फाउंडेशनच्या मराठवाडा अध्यक्ष युवा आघाडी तसेच जिल्हा उपाध्यक्ष पदाची धुरा त्यांच्या कडे सोपवण्यात येत आहे. या निवडीमुळे समाजाच्या सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे, व शुभेच्छा देण्यात येत आहे. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष उमेश आनेराव राज्य प्रवक्ते द्वारकादास फटाले यांच्या सह या वेळी संघटनेचे सचिव उमेश आनेराव बार्शी, शंकर वानेगावकर नांदेड, संजय मोगरे नाशिक, महीला अध्यक्ष विजयालक्ष्मी आनेराव, तर महाराष्ट्रातील सर्व जिल्हा पदाधिकाऱ्यांनी या निवडीबद्दल अभिनंदनांचा वर्षाव केला आहे.

## लातूर येथे एक दिवशी आरोग्य व आध्यात्मिक शिबिर प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत मोठ्या संख्येने साजरा

**दैनिक युवक आधार**
**लातूर प्रतिनिधी-**
**मोहम्मद पिंजारी**

दि.२९ आज सध्याच्या घाईघाईच्या जीवनामध्ये माणसांना व्यक्तींना आपल्या कामाशिवाय वेळ नसल्यामुळे शरीराकडे व आरोग्य यांच्याकडे लक्ष देण्याचे टाळाटाळ होत आहे त्यामुळे शरीराला न काम करण्याचे शारीरिक त्रास होण्याचे आजार हे आपण सतत पाहत असतो बघत असतो परंतु याच अनुषंगाने सर्व गोष्टीचा विचार करून सर्वसामान्य नागरिकांना एक दिवशी आरोग्य व अध्यात्मिक शिबिराचा मोफत लाभ मिळावा यासाठी प्रशांत कुलकर्णी राजाराम केलूरकर आबासाहेब रेड्डी भागवत कारभारी संजीव स्वामी यदुनाथ महाराज पंढरी शेळके कोरे साहेब या सर्व लातूरच्या प्रतिष्ठित व्यक्तीकडून या शिबिराचे आयोजन केले होते यामध्ये आदरणीय डॉ गोपाल शास्त्री यांनी २८ जानेवारी रोजी सकाळी १० ते ०५ वाजेपर्यंत आपल्या जीवनशैलीतील कशाप्रकारे बदल करायचा आहे त्याबद्दल मार्गदर्शन केले आहे दिन मे कच्च्या रात मे पक्का आणि सजनल रिजनल ओरिजनल अशा प्रकारचा आदर्श भोजन प्रणाली घेतल्यामुळे आपल्या जीवनात अनेक प्रकारच्या बिमारीवर रोगप्रतिकारशक्ती मात करू शकते याबाबत चांगले मार्गदर्शन केले गेले आणि शिबिरात सोलापूर परभणी औरंगाबाद या ठिकाणचे साधक आले होते लातूर मधील एकूण २०० लोकांनी या आरोग्य शिबिराचा व अध्यात्मिक शिबिराचा लाभ घेतला तरी या आरोग्य शिबिरास व आध्यात्मिक शिबिराचा १० ते १६ तारखे पर्यंत ज्यांना जमेल त्यांनी तसेच बी पी शुगर मनोरुगण आहेत अशा नागरिकांना या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे परंतु हा कार्यक्रम ज्यांनी घडवून आणला त्यांचे मात्र लातूर जिल्ह्यामध्ये कौतुक होताना दिसत आहे*



# गार्गीज ग्रुप पनवेल आयोजित हळदीकुंकू समारंभ संपन्न

### – गार्गीज महिला ग्रुप महिलांसाठी प्रेरणादायी व्यासपीठ

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

काल, दिनांक 28 जानेवारी 2025 रोजी गार्गीज ग्रुप, पनवेल यांच्या वतीने भव्य हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील महिला तसेच मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्यात सहभागी झालेल्या महिलांनी संस्कृती, परंपरा आणि एकत्रित उत्सव यांचा आनंद घेतला. रश्मी मोरे नेहा वेंगुर्लेकर आणि रसिका बोडस या तिघी महिलांनी मिळून सुरू केलेला हा गार्गीज ग्रुप महिलांसाठी केवळ एक समूह नसून उद्योजिकांना प्रोत्साहन देणारे आणि त्यांना आर्थिक तसेच सामाजिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विविध संधी उपलब्ध करून देणारे एक प्रेरणादायी व्यासपीठ आहे. या ग्रुपच्या माध्यमातून महिला विविध व्यवसायिक संधी मिळवतात, त्यांच्यातील नेतृत्वगुण वाढतात आणि त्या आपली स्वप्ने पूर्ण करण्याच्या दिशेने आत्मविश्वासाने वाटचाल करतात. समारंभाच्या निमित्ताने उपस्थित मान्यवर सौ. राजश्री सोनी यांनी महिला आणि गार्गीज ग्रुपच्या माध्यमातून महिलांना मिळणाऱ्या विविध संधींविषयी शुभेच्छा dilya. या समूहात अनेक उद्योजिका कार्यरत असून, त्यांना व्यवसायात पुढे जाण्याठी आवश्यक मार्गदर्शन, नेटवर्किंग आणि संधी उपलब्ध करून दिल्या जातात. कार्यक्रमास सक्षम रियल्टीज चे एमडी भगवान पाटील सी.ई.ओ. हरजींदर सिंग सी. एफ.ओ. अवतार सिंग आणि माजी नगरसेवक



श्री. राजू सोनी यांनी समारंभाला भेट देत गार्गीज ग्रुपच्या कार्याचे कौतुक केले. त्यांनी गार्गीज ग्रुपच्या हळदीकुंकू समारंभाला शुभेच्छा दिल्या. तसंच सक्षम रिअल्टीस्टच्या प्रतिनिधींनी त्यांच्या प्रोजेक्ट बद्दल अधिक माहिती महिलांना दिली. गार्गीज ग्रुप महिलांना सक्षम करण्यासाठी विविध प्रकारचे इव्हेंट्स आणि उपक्रम आयोजित करत असतो. या समारंभामुळे महिलांना एकमेकांशी संवाद साधण्याची, अनुभव शेअर करण्याची आणि नवीन संधी शोधण्याची सुवर्णसंधी मिळाली. गार्गीज ग्रुपच्या माध्यमातून अनेक महिलांना स्वतःचा व्यवसाय वाढवण्यास मदत होत आहे, तसेच त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि सामाजिक योगदान देण्याची संधी मिळते. या शानदार हळदीकुंकू समारंभाच्या यशस्वी आयोजनाबद्दल गार्गीज ग्रुपच्या फाउंडर रश्मी मोरे व त्यांच्या सहकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन! यापुढेही अशाच अनेक कार्यक्रमांच्या माध्यमातून महिलांना प्रेरणा मिळावी आणि समाजात सकारात्मक बदल घडवावा, हीच शुभेच्छा. तसंच कालच्या या हळदीकुंकू समारंभात कविताताई ठाकूर यांनी सादर केलेला कॉमेडी कॅरेक्टर कार्यक्रम अतिशय धमाल आणि मनोरंजनाने भरलेला होता, त्याचप्रमाणे प्रेरणा गायकवाड आणि समृद्धी साखरे यांनी सादर केलेला विशेष ॲक्ट मनःपूर्वक संदेश देणारा ठरला. 'आजची स्त्री आणि पारंपारिक प्रथा जपणारी स्त्री' यामधील फरक त्यांनी विनोदी शैलीत मांडला. लक्ष्मी साळवे यांनी 'महाराष्ट्राची हास्य जत्रा' कार्यक्रमातील लॉलीची भूमिका साकारून उपस्थितांना खळखळून हसवले. त्यांच्या कमाल कॉमिक टाइमिंग आणि हास्यप्रद अभिनयाने सर्वांना चांगलंच गालिब






केला. तसंच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नूतन पाटील यांनी सांभाळले. तर या कार्यक्रमात अनेक विविध मनोरंजनात्मक खेळ खेळून अनेकांना बक्षीस जिंकण्याची संधी उपलब्ध झाली तीन लकी विजेत्यांना लकी ड्रॉ च्या मार्फत बक्षीसे मिळाली तर हळदीकुंकू समारंभ मध्ये उत्कृष्ट पेहराव चे बक्षीस सौ. मनीषा वाणी
**सौ. स्मिता गायकवाड**
**सौ. स्वप्ना साखरे यांनी पटकावले.**

# स्वप्न बलशाली भारताचे... निमित्त व्याख्यानमालेचे... करु प्रबोधन समाजाचे...!!

### सामाजिक विचार मंचातर्फे व्याख्यानमालेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**भांडुप (प्रतिनिधी)-**

दरवर्षीप्रमाणेच यावर्षी देखील सामाजिक विचार मंचाने वैचारिक अशा व्याख्यानमालेचे आयोजन दि. ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत रात्रौ ७.०० वा. कांजुर को -ऑपरेटिव्ह सोसायटीचे मैदान (क्रॉम्प्टन मैदान )गणेश मंदिरासमोर, दातार कॉलनी, भांडुप (पुर्व)या ठिकाणी केले आहे. कांजूर-भांडुप



(पूर्व) विभागात स्वामी विवेकानंद यांच्या सार्थ शताब्दीचा मुहूर्त साधून २०१३ या वर्षापासून या व्याख्यानमालेस सुरुवात झाली. त्यानुसार दरवर्षी अभ्यासू व नावाजलेल्या व्याख्यात्यांना याठिकाणी निमंत्रित केले जाते. यावेळी शुक्रवार दि. ३१ जानेवारी रोजी व्याख्यात्या सौ. प्रज्ञा दर्भे सुखी संसाराचा पासवर्ड या विषयावर तर शनिवार दि. १ फेब्रुवारी रोजी व्याख्याते डॉ. अशोक बांगर धर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकर या विषयावर आणि रविवार दि. २ फेब्रुवारी रोजी व्याख्याते श्री. मंदार गजानन ओक हे सर्वधर्म परिषद आणि स्वामी विवेकानंद या विषयावर आपले विचारपुष्प गुंफणार आहेत. तरी कांजुर भांडुप परिसरातील नागरिकांनी या वैचारिक सुवर्णसंधीचा जास्तीतजास्त लाभ घ्यावा. तसेच दानशूर व्यक्तींनी मंडळास स्वेच्छेने आर्थिक सहकार्य करावे असे आवाहन सा.वि.मंच आणि कार्यकारिणीमार्फत करण्यात आले आहे.

## नेरे येथे श्री गणेशोत्सवाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: सन्मित्र गणेशोत्सव मंडळ, नेरे येथे एक फेब्रुवारी ते सात फेब्रुवारी दरम्यान गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मंडळ साजरा करत असलेल्या गणेशोत्सवाला 69 वर्ष पूर्ण झाली आहेत. एक जानेवारी रोजी श्री गणेश जयंती निमित्त श्री गणेश आगमन सोहळा होणार आहे. तर तीन फेब्रुवारी रोजी गणेश मंदिराचा वर्धापन दिन, 4 फेब्रुवारी रोजी श्री गणेश याग पूर्णाहुती, सहा फेब्रुवारी रोजी श्री सत्यनारायणाची महापूजा, 7 फेब्रुवारी रोजी श्रींचे विसर्जन होणार आहे. यावेळी नागरिकांनी दर्शनाला येऊन महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# पत्रकार प्रसाद गोरेगांवकर यांच्या लढ्याला यश ; शासकिय जमिन लवकरच शासनाच्या ताब्यात...

**प्रतिनिधी :-सचिन पवार**
**माणगांव रायगड**

**माणगांव** :-कार्यकारी अभियंता श्री. नामदे यांच्या लेखी अश्वासनानंतर पत्रकार प्रसाद गोरेगांवकर यांचे १३ तासांनी उपोषण मागे उपोषणाला अनेक मान्यवरांचा पाठींबा.. गोरेगांवात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेत वैयक्तिक आर. के. फिटनेस या नावाने व्यायाम शाळेचे बांधकाम पुर्ण झाले असून या बांधकामाकरीता कोणतीही पुर्व परवानगी न घेता हे बांधकाम वैयक्तिक रित्या करण्यात आले आहे. या शासनाच्या जागेत अनाधिकृतपणे करण्यात आलेल्या बांधकामाविरोधात गेला दिड वर्षापासून पत्रकार प्रसाद गोरेगांवकर हे लढा देत आहेत.. या आधी सदर जागेची मोजणी करण्यासाठी त्यांना २६ जानेवारी २०२४ रोजी सार्वजनिक बांधकाम उपविभाग माणगांव कार्यालयाबागेर उपोषण केले होते. उपोषणा दरम्यान त्यांना पत्र देऊन लवकरच मोजणी करण्यात येईल व




मोजणीत सा. बां. खात्याची जागा निघाल्यास कारवाई करण्यात येईल असे आश्वासित करण्यात आले होते. आश्वासनानंतर १८ मार्च २०२४ रोजी या जागेची मोजणी करण्यात आली. मोजणी मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेत बांधकाम झाल्याचे निष्पन्न झाले आहे यानंतर गेली वर्षभर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या झोपलेल्या अधिकाऱ्यांना पत्रकार प्रसाद गोरेगांवकर जागं करण्याचे काम करत आहेत. यासाठी त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांना पत्र देऊन दि. जानेवारी २०२५ पुर्वी सदर अनाधिकृत बांधकाम तोडण्याबाबत कळवत १० जाने. २०२५ पुर्वी न तोडल्यास २६ जानेवारी २०२५ रोजी उपोषण करावे लागेल असे कळविले होते परंतु कोणतीही कारवाई न केल्याने अखेर पत्रकार प्रसाद गोरेगांवकर यांनी २६ जानेवारी २०२५ रोजी सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयाबाहेर सकाळी १० वाजता उपोषण सुरु केले होते. या उपोषणा दरम्यान बापुसाहेब सोनगिरे, हरेश शेठ, युवा उद्योजक वसिम सनगे, भाजप चे तालुका अध्यक्ष गोविंद कासार, उपाध्यक्ष राजु मुंढे, कार्यकर्ते अशोक यादव चिन्मय मोने, जेष्ठ पत्रकार मस्जिद हाजिते, शिवसेना युवासेना जिल्हाध्यक्ष विपुलजी उभारे, गोरेगांव विभागीय अध्यक्ष दिनेशजी हरवंडकर, उमेश लाड, दिपक भोईर तसेच पत्रकार सचिन पवार, दिपक दपके, नंदकुमार चांदोरकर, नितेश पुरारकर, रोहिदास गर्जना परिवारचे सदस्य यांनी प्रत्यक्ष भेट घेत पाठींबा दर्शविला होता.. तसेच अनेक मित्र परिवार तसेच हितचिंतकांनी देखील या उपोषणाला फोन द्वारे प्रसाद गोरेगांवकर यांना पाठींबा देत शुभेच्छा दिल्या होत्या.. दरम्यान उपकार्यकारी अभियंता श्री. गणगणे, सहाय्यक अभियंता माळी यांनी कारवाई करतो आपण उपोषण मागे घ्या अशी विनंती वारंवार केली परंतु प्रसाद गोरेगांवकर यांनी उपोषण मागे घेतले नाही... त्यांनी शासकिय जमिनीत झालेल्या अतिक्रमणावर तोडण्याचे आदेश येईपर्यत सिल लावण्यात यावे मी उपोषण मागे घेतो असे सांगीतले होते परंतु तसं करता येत नाही असे उत्तर मिळाल्याने त्यांनी उपोषण चालुच ठेवले होते..माणगांव पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक बोऱ्हाडे यांनी देखील उपोषण मागे घेण्यासाठी विनंती केली होती परंतु प्रसाद गोरेगांवकर हे आपल्या म्हणण्यावर ठाम होते अखेर रात्री उशिरा कार्यकारी अभियंता श्री. नामदे आले त्यांच्या सोबत चर्चा केल्यानंतर त्यांनी या सर्व प्रकारची तसेच जागेची पडताळणी करुन १५ मे पर्यत सदर अतिक्रमण हटविण्याचे आश्वासन दिल्याने पत्रकार प्रसाद गोरेगांवकर यांनी अखेर रात्री १२.२५ ला उपोषण मागे घेतले आहे..

# दहा वर्षाच्या प्रतीक्षेनंतर पैठणचे संत ज्ञानेश्वर उद्यान पर्यटकांसाठी खुले,

**दैनिक युवक आधार**
**पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे.**

म्हैसूरच्या वृंदावन गार्डनच्या धर्तीवर पैठण नाथसागर धरण पायथ्याशी साकारलेले संत ज्ञानेश्वर उद्यान मागील आठ ते दहा वर्षापासून बंद पडलेल्या अवस्थेत असल्याने शोभिवंत फूल झाडे,रंगीत कारंजे, लहान मुलांचे खेळणी व ईतर वस्तूंची प्रचंड वाताहात झाल्याने पर्यटकांनी या उद्यानाकडे पाठ फिरवली होती. खासदार संदीपान पा. भूमरे तसेच नवनिर्वाचित आमदार विलास बापू भूमरे यांनी उद्यानाच्या सुशोभीकरणासाठी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातुन मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करून घेवुन काही कामे पूर्ण करत अखेर २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून अपूर्णका होईना कसेबसे हे उद्यान पर्यटकांसाठी पूर्वरत खुले करण्यात आले आहे. सद्यस्थितीत जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या ताब्यातील




म्हैसूर वृंदावन गार्डनच्या धरतीवर साकारलेल्या संत ज्ञानेश्वर उद्यान गेल्या दहा वर्षांपासून बंद अवस्थेत असल्याने येथील अनेक झाडे नष्ट झाली तसेच संगीत कारंजा च्या किमती पितळी वस्तूसह, खेळणी व ईतर सामान चोरीला जावून उद्यानाच्या अंतर्गत प्रचंड वाताहात झाल्याने या उद्यानात पाहण्यासारखे काहीही शिल्लक उरले नसल्याने पर्यटकांनी याकडे पाठ फिरवली त्यामुळे पैठण शहारातील छोट्या मोठ्या व्यावसायीक हॉटेल, व किरकोळ व्यापाऱ्यांच्या धंद्यावर याचा प्रचंड परीणाम झाला होता.त्यामुळे छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे खासदार संदीपान पा. भुमरे व पैठणचे नवनिर्वाचित आमदार विलास बापू भुमरे यांनी बंद अवस्थेतील संत ज्ञानेश्वर उद्यान पर्यटकांसाठी खुले करण्यासाठी पुढाकार घेऊन तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून उद्यानासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध केला व निधीची मंजुरी मिळाल्या नंतर पाटबंधारे विभागाच्या माध्यमातुन उद्यानातील दुरुस्तीचे काम हाती घेतले.फुल झाडी, हिरवळ, संगीत कारंजे व वाहनतळ, अंतर्गत रस्त्याच्या दुरुस्तीचे कामे तसेच पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने उद्यान परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे कामे करण्यात आले. व काही अजुनही कामे अपूर्ण आहेत.त्यातच पाटबंधारे विभागाने खासदार संदीपान पा.भुमरे यांच्या उपस्थितीत संत ज्ञानेश्वर उद्यान २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधुन मोठा गाजावाजा करत पर्यटकांसाठी खुले केले आहे. याप्रसंगी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत जाधव, तहसीलदार सारंग चव्हाण, पोलिस निरीक्षक संजय देशमुख, युवा नेते शिवराज भुमरे,नंदलाल काळे, नायब तहसीलदार राहुल बनसोडे,उद्यान विभागाचे अभियंता दीपक डोंगरे,अभियंता तुषार विसपुते,राजु गायकवाड, नामदेव खरात, प्रा. संतोष गव्हाणे, संतोष खोबरे,साईनाथ कर्डिले, भूषण कावसानकर, प्रशांत जगदाळे, किशोर चौधरी आदींची उपस्थिती होती.

# अपयश न मानता स्पर्धेत टिकून राहण्यासाठी प्रयत्न करा अभिनेता संजय नार्वेकर

### नांदुर्डी जनता विद्यालयात हंगामा सांस्कृतिक कार्यक्रम संजय नार्वेकर यांचे उपस्थितीत संपन्न

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

निफाड तालुक्यातील नांदुर्डि जनता विद्यालयात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सांस्कृतिक महोत्सव डॉ. संजयआहेर यांच्या खास प्रयत्नाने मराठी व हिंदी चित्रपट अभिनेते संजय नार्वेकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला, मराठी अभिनेते संजय नार्वेकर व मविप्र समाज संस्था उपाध्यक्ष विश्वास बापूराव मोरे, मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर महिला संचलिका शोभाताई बोरस्ते ,निफाड तालुका संचालक शिवाजी गडाख,सर्व स्कूल कमिटी अध्यक्ष एकनाथ निकम, रामदास बोराडे ,सीताराम . ढोमसे, यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक म्हसकर बी डी यांनी केले यावेळी मराठी अभिनेते संजय नार्वेकर यांनी विद्यार्थी व शिक्षक यांच्या विषयी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी अपयश न मानता स्पर्धेत टिकून राहण्यासाठी काय करावे या बद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व्यक्त करून आपल्या जीवन प्रवास सांगताना अगदी साधा माणूस चे एक उत्कृष्ट चित्रपट अभिनेता बनण्यासाठी केलेले संघर्ष याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी त्यांनी शिक्षकांविषयी आदरभाव व्यक्त केली , संस्थेचे उपाध्यक्ष विश्वास बापू



मोरे व सभापती बाळासाहेब आप्पा क्षीरसागर यांनी आपले मनोगत व्यक्त करून कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हसकर बी डी व पर्यवेक्षक दाते आर पी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना शुभेच्छा दिल्या, या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक महोत्सव हंगामा २०२५ अभिनव बाल विकास मंदिर व जनता विद्यालय व जुनियर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यालयात सांस्कृतिक महोत्सव यशस्वीपणे पार पाडला यावेळी विद्यार्थ्यांनी अनेक प्रकारच्या समूह नृत्यामध्ये भाग घेऊन आलेल्या प्रमुख मान्यवर संजय नार्वेकर संस्थेतील विविध पदाधिकारी पंचक्रोशीतील मान्यवर व विद्यार्थी पालकांची मने जिंकून घेतली, यावेळी विद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निकम एस डी , गांगुर्डे मॅडम व शिंदे डी पी मॅडम यांनी केले.

# पालिकेला १०० कोटींचा तोटा

## भाडेकराराचे नूतनीकरण रखडले; सुधार समितीअभावी काम मंदावले

**मुंबई :** महसूल वाढीसाठी मुंबई महापालिका प्रशासनाने ३२० भूखंड भाडेकरार दिले आहेत. मात्र गेल्या पाच वर्षांत ३२० पैकी २११ भूखंडांचे नूतनीकरण रखडल्याने पालिकेला वर्षाला १०० कोटींच्या नुकसानीला सामना करावा लागत आहे.

७ मार्च २०२२ रोजी नगरसेवकांचा कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर सुधार समितीची बैठक होणे शक्य नाही. त्यामुळे सुधार समिती अभावी कामे थंडबस्त्यात गेली असून पालिकेला वर्षाला कोट्यवधी रुपयांचे नुकसान सहन करावे लागत आहे.

मुंबई महापालिका प्रशासनाने महसूल वाढीसाठी ४,१७७ भूखंड भाडेकरार दिले आहेत. यात १६० भूखंड राज्य सरकारच्या अखत्यारीतील आहेत. मात्र या भुखंडाचा भाडेकरार २०१३ सालापासून संपुष्टात आला आहे. त्यापैकी १०९ भूखंडांचे नूतनीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. तर सुधारित भाडेकरार धोरणानुसार २०२० नंतर ३२० भूखंडापैकी १०९ भूखंडाचे नूतनीकरण करण्यात आले आहे. परंतु पाच वर्षे उलटली तरी २११ भूखंडांचे नूतनीकरण करण्यात आलेले नाही.

पालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे आता भूखंडावर अतिक्रमणाचा विळखा बसला आहे. तर नवीन धोरणानुसार भूखंड अतिक्रमणमुक्त करून थकीत भाडे व त्यावर दंड आकारून नूतनीकरण करण्यात येत आहे. मात्र नूतनीकरणाची प्रक्रिया थंडबस्त्यात गेली आहे. आगामी मुंबई महापालिका निवडणुकीनंतर सुधार समिती अस्तित्वात आल्यानंतर नूतनीकरणाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. आगामी मुंबई महापालिका निवडणुका कधी होतील यावर अद्याप पडदा आहे. त्यामुळे नूतनीकरण होत नसल्याने पालिका प्रशासनाला वर्षाला १०० कोटी रुपयांच्या नुकसानीला सामना करावा लागणार आहे.



एकूण लीज मालमत्ता (राज्य व पालिका) ४,१७७

| लिज संपलेल्या | नूतनीकरण झाले | नूतनीकरण रखडले |
|---|---|---|
| ३२० | १०९ | २११ |

### वर्षाला १०० कोटींचे नुकसान कसे?

एक हजार चौरस मीटर भूखंडावर वर्षाला ५ लाखांपर्यंत भाडे मिळते. मात्र २११ भूखंडाचे नूतनीकरण रखडल्याने भाडे व दंडाची रक्कम आकारणे शक्य नाही. त्यामुळेच पालिकेला वर्षाला १०० कोटींचे नुकसान सहन करावे लागत आहे.

### नवीन धोरणानुसार भूखंडाचा भाडेकरार

जुन्या धोरणानुसार ९० वर्षांसाठी भूखंड भाडेकरार दिले जात होते. मात्र पालिकेने २०१७ नंतर नवीन धोरण तयार केले. नवीन धोरणानुसार ९० वर्षांऐवजी ३० वर्षांच्या कालावधीसाठी भाडेकराराची मुदत करण्यात आली. याचे भाडेही रेडिरेकनरनुसार नव्या धोरणानुसार ठरले आहे. या नवीन धोरणाची २०20 पासून भाडेकरार नूतनीकरण करण्याची अंमलबजावणी सुरू करण्यात आली.



डॉ. अभिषेक साटम यांनी टिपलेले पुरस्कारविजेते छायाचित्र.

# महापेक्स २०२५ छायाचित्रण स्पर्धेत पालिका अधिकारी डॉ. अभिषेक साटम प्रथम



**मुंबई :** राज्य पोस्ट विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या वन्य जीवांवर आधारित महापेक्स २०२५ या छायाचित्रण स्पर्धेत मुंबई महापालिकेचे वीरमाता जिजामाता भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणीसंग्रहालय जीवशास्त्रज्ञ डॉ. अभिषेक साटम यांच्या छायाचित्राला प्रथम क्रमांक मिळाला आहे.

महाराष्ट्र आणि गोव्यातील वन्यजीवांवर आधारित महापेक्स २०२५ ही छायाचित्र स्पर्धा पोस्टाने आयोजित केली होती. १० विजेत्या छायाचित्रांचा पोस्टकार्डचा एक संग्रह प्रसिद्ध करण्यात आला. रचलेली पोस्टकार्डे प्रदेशातील समृद्ध जैवविविधता दर्शवतात तसेच निसर्गाचे सौंदर्य दर्शवतात.

बेनहेल अंताव, पर्यावरणतज्ज्ञ (गोवा); जयती समद्दार, महाप्रबंधक (वित्त), महाराष्ट्र सर्कल; राहुल खोत, उपसंचालक, नैसर्गिक इतिहाससंग्रह, बीएनएचएस; अदनान अहमद, पोस्टमास्टर जनरल, छत्रपती संभाजीनगर क्षेत्र आदींच्या उपस्थितीत या पोस्टकार्डचे अनावरण नुकतेच करण्यात आले.



# अतिक्रमणविरोधात मुंबईत कारवाईचा धडाका

### अनधिकृत ५४४ हातगाड्या, ९६८ सिलिंडर, साहित्य जप्त

**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेने 'फेरीवालामुक्त परिसर' मोहीम अंतर्गत गेल्या सात दिवसात विविध विभागांच्या ठिकाणी अतिक्रमण निर्मूलन कारवाई पार पडली. या कारवाईत फेरीवाल्यांकडून २ हजार ७६३ साधनसामुग्री जप्त करण्यात आली आहे. त्यात ५४४ चारचाकी हातगाड्या, ९६८ घरगुती गॅस सिलिंडर आणि १ हजार २५१ इतर विविध प्रकारच्या साहित्याचा समावेश आहे.

उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पालिका हद्दीतील वर्दळीची २० ठिकाणे फेरीवाला मुक्त ठेवण्याचे निश्चित करण्यात आले आहे. या अनुषंगाने, मुंबईकर नागरिकांना पदपथ आणि रस्त्यांचा वापर करताना अडथळा ठरणाऱ्या तसेच आरोग्यासाठी अपायकारक अशा पद्धतीने उघड्यावर अन्न पदार्थांची विक्री करणाऱ्या फेरीवाल्यांविरोधात सातत्याने कारवाई केली जात आहे. न्यायालयाच्या निर्देशानुसार अनधिकृत फेरीवाले, बेवारस वाहने, पदपथावरील अतिक्रमणे यावर करावी, असे निर्देश पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले.

# म्हाडाच्या पुणे मंडळाची आज संगणकीय लॉटरी

**३ हजार ६६२ घरांसाठी ७१ हजार ६४२ अर्ज प्राप्त**

**मुंबई :** म्हाडाच्या पुणे मंडळातर्फे पुणे, पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीएसह सोलापूर जिल्ह्यातील विविध गृहनिर्माण योजनेतील ३ हजार ६६२ सदनिकांच्या विक्रीकरिता संगणकीय लॉटरी राज्याचे उपमुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्र एकनाथ शिंदे यांच्या हस्ते काढण्यात येणार आहे. बुधवार, २९ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता पुणे जिल्हा परिषद सभागृहात ही लॉटरी काढण्यात येणार आहे. या लॉटरीसाठी ७१ हजार ६४२ अर्ज प्राप्त झाले असल्याची माहिती म्हाडा पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी राहुल साकोरे यांनी दिली.

पुणे मंडळातर्फे १० ऑक्टोबरपासून ऑनलाइन अर्ज नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेस सुरुवात करण्यात आली. या लॉटरीमध्ये म्हाडा गृहनिर्माण योजनेअंतर्गत ९३ सदनिका, २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत पुणे महानगरपालिका, चिंचवड महानगरपालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीतील एकूण ३ हजार ५६९ सदनिकांचा समावेश आहे. लॉटरीचा निकाल अर्जदारांना सोयीस्कररीत्या पाहता यावा याकरिता मंडळाने नियोजन केले असून सभागृहाच्या आवारात व सभागृहात एलईडी स्क्रीन लावण्यात येणार आहे.

अर्जदारांना 'वेबकास्टिंग' तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सोडतीच्या कार्यक्रमाचे घरबसल्या थेट प्रक्षेपण बघण्याची सुविधा म्हाडाच्या @mhadaofficial या अधिकृत युट्यूब चॅनल व फेसबूक पेजवरून करण्यात येणार आहे. थेट प्रक्षेपण वेबकास्टिंगद्वारे करण्यात येणार असल्याने नागरिकांना अल्पावधीतच लॉटरीचा निकाल जाणून घेता येणार आहे. विजेत्या अर्जदारांची यादी म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या वेबसाइटवर सायंकाळी ६ वाजता प्रसिद्ध केली जाणार असून विजेत्या अर्जदारांना एसएमएसद्वारेही विजेता ठरल्याबाबतची माहिती तत्काळ कळविली जाणार आहे.

### योजनांसाठी विपणन संस्थांची नेमणूक

म्हाडा पुणे मंडळातर्फे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर दिवे, सासवड, पिंपरी वाघेरे, महाळुंगे इंगळे व ताथवडे फक्त याच ठिकाणी सदनिकांचे वितरण करण्यासाठी विपणन संस्थांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांच्याद्वारे घरांचे वितरण करण्यात येत आहे. तरीसुद्धा त्यांच्याशी व्यवहार करताना मिळकत व्यवस्थापक, पुणे मंडळ यांच्याकडून पडताळणी करून घ्यावी, असे आवाहन मंडळाचे मुख्य अधिकारी राहुल साकोरे यांनी केले आहे.

# जुन्या बेवारस गाड्यांसाठी पालिकेने पुन्हा काढल्या निविदा

**मुंबई :** मुंबईतील जुन्या आणि बेवारस गाड्यांची विल्हेवाट लावण्यासाठी पालिकेने प्रसिद्ध केलेल्या निविदेला प्रतिसाद न मिळाल्याने पालिकेला पुन्हा निविदा काढाव्या लागल्या. आधीच्या निवीदाप्रक्रियेतील अपेक्षित रक्कमेत कपात करून काही अधिकच्या सवलती दिल्यानंतर या निविदांना आता प्रतिसाद मिळाला असून लवकरच हा प्रकल्प मार्गी लागेल असा असा दावा पालिकेच्या वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी केला आहे.

मुंबई महानगरपालिकेने ऐरोली जकात नाका येथे भंगार यार्डासाठी जागा निश्चित केल्यानंतर मुंबई पालिकेच्या हद्दीतील जून्या आणि बेवारस गाड्या उचलण्यासाठी इच्छुक कंपन्याकडून निविदा' मागवल्या होत्या. त्यासाठी शहर आणि उपनगरांतून प्रत्येकी दीड कोटी रूपयांच्या निविदा काढण्यात आल्या होत्या.

### रक्कम कमी करून पुन्हा निविदा

पालिकेने जाहीर केलेल्या दीड कोटी रुपयांच्या निविदांना प्रतिसाद न मिळाल्याने आता प्रत्येक विभागात १ कोटी रुपयांच्या निविदा जाहीर करण्यात आल्या आहेत. १ कोटीपेक्षा अधिक किंमत देणाऱ्या कंत्राटदार कंपनीला हे कंत्राट दिले जाणार आहे. भंगार यार्डचे काम १० वर्षांसाठी भाडेतत्त्वावर देण्यात येणार असून प्रत्येक वाहनामागे महापालिकेला महसूल मिळणार आहे.

### प्रतिसाद न मिळाल्यास वाहने भंगारात

वर्षानुवर्षे अनेक वाहने रस्त्यांच्या कडेला असतात. या वाहनांवर दावा सांगण्याठी कुणी न आल्यास ती वाहने जप्त केली जातात. ही वाहने जप्त करून मुंबई महापालिकेच्या गोदामात ठेवली जातात. त्यानंतरही पुन्हा वाहन मालकाशी संपर्क साधला जातो.

# सीकेपी समाजाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात कार्यक्रमांची रेलचेल



**मुंबई :** सीकेपी समाज, बोरिवली यांचे वार्षिक स्नेहसंमेलनात विविध कार्यक्रमांची रेलचेल होती. बोरिवलीचे ९८ वर्षीय ज्येष्ठ सदस्य अनंत भास्कर गुप्ते यांचा विशेष सन्मान हे या वार्षिक स्नेहसंमेलनाचे वैशिष्ट्य होते. वैश्य समाज हॉल, बोरिवली (पूर्व) येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

सीकेपी, बोरिवली संस्थेतर्फे स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. स्नेहसंमेलनात ज्ञाती बंधु-भगिनींनी अगत्याने उपस्थित राहिले. सांस्कृतिक, वैचारिक देवाण-घेवाण हा यामागचा मुख्य हेतू असून ज्ञाती बांधवांमधील वर्धिष्णू वृत्ती जतन करण्यावर भर आहे.

वार्षिक स्नेहसंमेलन, महिलावर्गाकरिता पारंपरिक हळदी-कुंकू समारंभ, विशेष गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार यावेळी करण्यात आला.

# वाघमारे यांनी पदभार स्वीकारला

**मुंबई :** राज्याचे माजी अपर मुख्य सचिव दिनेश वाघमारे यांनी राज्य निवडणूक आयुक्तपदाचा पदभार स्वीकारला. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी त्यांचे स्वागत केले.

वाघमारे यांची पाच वर्षांसाठी राज्य निवडणूक आयुक्तपदी नियुक्ती केली आहे. त्यासंदर्भातील अधिसूचना २० जानेवारी रोजी प्रसिद्ध झाली होती. त्यानुसार त्यांनी राज्याचे सातवे राज्य निवडणूक आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला. यू. पी. एस. मदान यांचा कार्यकाळ ४ सप्टेंबर २०२४ रोजी संपल्यापासून हे पद रिक्त होते. वाघमारे यांनी इलेक्ट्रॉनिक अभियांत्रिकीमध्ये बीटेक केले आहे. आयआयटी खरगपूरमधून त्यांनी संगणकशास्त्रात एमटेक; तर यूकेमधून 'विकास व प्रकल्प नियोजन' विषयात एमएस्सी केले आहे. १९९४ तुकडीचे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी असलेले श्री. वाघमारे यांनी वैद्यकीय शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव म्हणून भारतीय प्रशासकीय सेवेतून स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली आहे. रत्नागिरीचे सहायक जिल्हाधिकारी म्हणून वाघमारे यांच्या प्रशासकीय कारकीर्दीला सुरुवात झाली होती. वाशीम, यवतमाळ जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदाची जबाबदारी त्यांनी सांभाळली आहे.



सांताक्रुझ वृत्तपत्र विक्रेता संघाच्या वतीने सत्यनारायण महापूजेचे सांताक्रुझ (पश्चिम) येथे सिद्धेश ज. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते.

## मेरीटाइम बोर्डाला ट्रॅफिक सिम्युलेशन अभ्यासाची मागणी

**मुंबई :** महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाने (एमएमबी) ट्रान्सपोर्ट मरीनाला प्रिन्सेस डॉक येथे हलवण्याबाबत आक्षेप व्यक्त केला आहे. त्यानंतर कुलाब्यातील नागरिकांनी गेटवे ऑफ इंडिया येथे ट्रॅफिक सिम्युलेशनचा अभ्यास करण्यासाठी एमएमबीने एक प्रतिष्ठित एजन्सी नियुक्त करावी अशी मागणी कुलाब्यातील भाजपचे माजी नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी केली आहे.

# सीकेटी महाविद्यालयात कॉमर्शिया महोत्सव उत्साहात साजरा




**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या वाणिज्य मंडळाचा वार्षिक शैक्षणिक महोत्सव कॉमर्शिया'Commercia'२०२४-२५' दिनांक २७ व २८जानेवारीला उत्साहात साजरा झाला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.एस.के. पाटील यांची उपस्थिती लाभली. वाणिज्य शाखेचे प्रमुख प्रो. डॉ.एस.बी.यादव, व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रो. डॉ.अजय दीक्षित, लेखा व वित्त विभाग प्रमुख डॉ. निलेश कोळी, व्यवस्थापन विभाग प्रमुख प्रा.कुशलकुमार कुराणी आणि वाणिज्य मंडळाच्या प्रमुख डॉ.कीर्ती वर्मा इत्यादी मान्यवर उपस्थित होते. उदघाटन कार्यक्रमाच्या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य एस. के.पाटील यांनी उपस्थितांना संबोधित करताना महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिलेल्या सोयी सुविधांबाबत माहिती दिली व विद्यार्थ्यांनी स्वतःच्या करिअर वृद्धीसाठी या सुविधांचा उपयोग करण्यास सांगितले. तसेच वाणिज्य शाखेचे प्रमुख एस.बी.यादव यांनी यावर्षीचा शैक्षणिक महोत्सव कॉमर्शिया २०२४-२०२५ बाबत उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वार्षिक महोत्सवात ब्रांड लोगो डिझाईन, ब्रेन विझार्ड कॉम्पिटिशन, बिझनेस प्लान कॉम्पिटिशन टाईप ओ मास्टर, बिंदास बोल कॉम्पिटिशन, वॉर ऑफ थॉट, आणि कौन बनेगा सेल्स चॅम्पियन इत्यादी स्पर्धांचा समावेश होता. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये भरघोस प्रतिसाद नोंदविला. त्याचप्रमाणे, यावर्षी नव्याने सुरु केलेला 'बेस्ट स्टुडन्ट पार्टिसिपेशन वॉर्ड ऑफ कॉमर्शिया २०२४-२५' टी.वाय.बी.एम.एस.ची विद्यार्थिनी ज्योती चौहान हिने पटकावला. विजेत्या विद्यार्थ्यांना महोत्सवाच्या सांगता कार्यक्रमात प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.या महोत्सवाच्या सांगता कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियांका दुबे या विद्यार्थिनीने केले. तसेच ज्योती फडतरे या विद्यार्थिनीने कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.

## वसुंधरा परिवार सोशल फाउंडेशनच्या वतीने अध्यक्ष योगिताताई गोसावी नेहमीच सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबवित असतात.

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी संतोष लांडे



योगिता ताई त्यांच्या या सामाजिक उपक्रमात महिलांना पण सहभागी करून घेत असतात जेणे करून त्यातून त्यांना प्रेरणा मिळेल. योगिता ताई नेहमीच त्यांचा वाढदिवस अनाथ अंध दिव्यांग मुले व वृद्धाश्रमातील वृद्ध माता पिता बंधू भगिनींच्या सोबत साजरा करतात. यावेळेस सिंहगड पायथा येथील सेवधाम या वृद्धाश्रमातील वृद्ध माता भगिनींच्या सोबत वाढदिवस साजरा केला. प्रतिभा ताई पायगुडे ह्या गेली 27 वर्षे हे वृद्धाश्रम मायेच्या ममतेने सांभाळत आहेत. त्यांची काळजी घेत आहेत त्यांना मायेचा आधार दिला आहे. केक कट करून झाल्यावर अनिल काका यांनी त्यांच्या सुरेल आवाजात अप्रतिम गाणे सादर केले. सर्वांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून खूप समाधान लाभले. परत नक्की या असे सर्वजण सांगत होते. तुम्ही आलात की आम्हाला खूप छान वाटते असे बोलताना त्यांच्या भावना दाटून आल्या होत्या. प्रतिभा ताई करत असलेले हे कार्य अतिशय कौतुकास्पद आहे. त्यांच्या या कार्यास मनापासून सलाम. त्यांचे वय 70 च्या आसपास आहे आणि या वयातही त्या सदाशिव पेठ येथून रोज सकाळी 8 वाजता बसने इतक्या लांब जातात. त्यांचा हा नित्यक्रम कधीच त्या चुकवत नाहीत. त्यांनी त्यांच्या कार्याला वाहून घेतले आहे. अशा व्यक्तींचा सन्मान व्हायलाच पाहिजे म्हणून वसुंधरा परिवार सोशल फाउंडेशन व प्रबळ महाराष्ट्र दैनिक यांच्या वतीने प्रतिभा काकुंचा सत्कार करून सन्मानित करण्यात आले. वसुंधरा परिवार सोशल फाउंडेशनच्या वतीने बचतगटातील महिलांनी बनवलेले उन्हाळी पदार्थ कुरडई पापड शेवई देण्यात आले. यावेळेस प्रबळ महाराष्ट्रचे संपादक व सूर्योदय सोलर कंपनीचे ओनर कृष्णा देशमुख सर, शशिकला महाडिक व बाऊन्सर रुपाली दोशी उपस्थित होते.

# क्रिकेटच्या लाकडी बॅटने मारहाण करून केले ठार

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

क्रिकेटच्या लाकडी बॅटने चेहऱ्यावर आणि पाठीवर प्रहार करून जयेश वाघे (बेलपाडा आदिवासी वाडी) याची हत्या केल्याप्रकरणी आरोपी मन्नू दिनेश शर्मा (राहणार बेलपाडा सेक्टर 3) याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मृत जयेश हा पनवेल महानगरपालिका येथे मलनिसारण वाहनावर सफाईचे काम करत होता. 23 जानेवारी रोजी रात्री साडेनऊ ते पावणेदहाच्या दरम्यान क्रिकेट मैदानाच्या बाजूच्या रस्त्यावर आदिवासी वाडी, बेलपाडा, सेक्टर तीन खारघर येथे जयेश आणि त्याचे इतर मित्र हे चिकन बनवत होते. जयेश आणि मन्नू हे दोघेही मित्र आहेत. मन्नू यांच्याकडून चिकन साठी कोणतीही वर्गणी येत नाही, या कारणावरून जयेश आणि मन्नू यांच्यात वाद झाला आणि शिवीगाळ करण्यात आली. जयेशने मन्नू यांच्या कानाखाली मारली. याचा राग आल्याने मनु याने जयेशला हाताबुकयांनी छातीत आणि पोटावर मारहाण केली आणि क्रिकेटच्या लाकडी बॅटने चेहऱ्यावर आणि पाठीवर प्रहार केले. यात जयेश हा गंभीर जखमी झाला. त्याला एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे दाखल करण्यात आले. 27 जानेवारी रोजी सकाळी सात वाजता त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर आरोपी विरोधात गुन्हा दाखल करून खारघर पोलिसांनी मन्नू शर्मा याला अटक केली.